MHBI150016152022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | ०२/११/२०२२ |
| नोंदणी तारीख | :– | ०२/११/२०२२ |
| निकाल तारीख | :– | ०५/०५/२०२५ |
| कालावधी | :– | **वर्षे महिने दिवस**<br>**०२ ०६ ०४** |

**(भाग – "अ")**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय पाटोदा यांचे न्यायालयात, ता. पाटोदा, जिल्हा – बीड**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती एस.एन.निकम)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२४/२०२२ **निशाणी क्र.११/ब खाली**

सिएनआर क्र.MHBI150016152022

**(पोलीस ठाणे पाटोदा गु.र.नं.१५७/२०२२)**

फिर्यादी :– महाराष्ट्र सरकार तर्फे,
पोलिस ठाणे अंमलदार
पोलिस ठाणे पाटोदा

सरकारतर्फे सादरकर्ते :– सहा. सरकारी अभियोक्ता
श्री. डी.जी.पौळ

... . **विरुध्द** ... .

आरोपी :– बाजीराव जनार्धन कोकाटे,
वय – ५५ वर्षे, पत्ता – दासखेड,
ता.पाटोदा, जि.बीड

आरोपीतर्फे सादरकर्ते :– विधीज्ञ श्री.एस.एन.घुमरे

**(भाग – "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०३/०९/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल नोंदणीची तारीख | ०३/०९/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०२/११/२०२२ |

| | |
|---|---|
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | २२/०३/२०२४ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखुन ठेवला ती तारीख | ०५/०५/२०२५ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५/०५/२०२५ |
| शिक्षा झाली असेल तर ती तारीख | ---- |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेली कलम | निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | शिक्षेत सुट दिलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाजीराव जनार्धन कोकाटे | नोटीस | २३.०२.२०२४ | मुं.दा.का. कलम ६५(ई) | निर्दोष | - | - |

## (भाग - "क")
## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदारांची नावे | साक्षीदारांचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | सुनिल विलासराव जायभाये | फिर्यादी | ११ |
| २ | मधुकर माणिक शेलार | जप्ती पंच | ११ |

आरोपीतर्फे कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीतर्फे पुरावा नाही.

## अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी नंबर दिलेल्या कागपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१४/अभियोगपक्ष | फिर्याद |
| २ | नि.क्र.१३/अभियोगपक्ष | जप्ती पंचनामा |

## "ड" - गुन्हयातील जप्त वस्तु / मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | एम.आर.नं.५३/२०२२ | देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. च्या ११ सिलबंद बाटल्या. |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## ( दिनांक ०५/०५/२०२५ रोजी पारीत )

**०१.** आरोपी मुंबई दारुबंदी कायदा,१९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दोषारोप संबंधीच्या संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**<u>अभियोगपक्षाच्या खटल्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे</u> :**

**०२.** अभियोगपक्षाचे कथनाप्रमाणे दिनांक ०३.०९.२०२२ रोजी १६.२० वाजणेचे सुमारास राहते घरी, दासखेड, ता.पाटोदा जि.बीड आरोपी बिगर परवाना, बेकायदेशीररित्या देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. ११ सिलबंद बाटल्या असा एकुण रक्कम रु.११००/– चा मुद्देमाल स्वतःजवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असताना मिळून आला. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद नोंद झाली.

**०३.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.डी.जी.पौळ व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.घुमरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन निशाणी ११ खाली नोंदविणेत आले.

**०५.** प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थितीत होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपी दिनांक ०३.०९.२०२२ रोजी १६.२० वाजणेचे सुमारास राहते घरी, दासखेड, ता.पाटोदा जि.बीड येथे बिगर परवाना, बेकायदेशीररित्या देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. ११ सिलबंद बाटल्या असा एकुण रक्कम रु.११००/– चा मुद्देमाल स्वतःजवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असताना मिळून आल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |

२. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ साठी :–</u>**

**०६.** प्रामुख्याने या ठिकाणी नमूद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोगपक्षास, आरोपी बिगर परवाना, बेकायदेशीररित्या देशी किंवा विदेशी दारु स्वतःजवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असताना मिळून आला हा अंतर्भुत घटक सिध्द करावा लागेल.

**०७.** आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र. १ – सुनिल विलासराव जायभाये यांना तपासले त्यांनी कथन केले की, दिनांक ०३.०९.२०२२ रोजी ते, होमगार्ड हंगे, नाईकनवरे वैद्यकिन्ही येथे पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त बातमी मिळाली की, राहते घरी, दासखेड, ता.पाटोदा जि.बीड येथे आरोपी बेकायदेशीरपणे देशी दारुची विक्री करत आहे. त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष छापा मारला असता, त्यांना आरोपीचे ताब्यातून देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. च्या ११ सिलबंद बाटल्या असा एकुण रक्कम रु.११००/– मुद्देमाल मिळून आला. जप्त मुद्देमालपैकी एक बॉटल नमुन्यासाठी काढून घेतली व उर्वरीत मुद्देमाल दोन पंचांसमक्ष जप्त केला. त्यानंतर ते आरोपीला घेऊन पोलीस स्टेशनला आले व निशाणी १४ प्रमाणे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

**०८.** या उलट आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने कथन केले की, छापा टाकण्यापूर्वी त्यांनी बनावट ग्राहक पाठविले नव्हते तसेच छापा टाकण्यासाठी गेले असता, त्यांनी पंचांना त्यांची अंगझडती दिली नव्हती. त्यांना घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नसल्याचे व हॉटेलच्या मालकीबाबत कागदपत्रे दाखल केले नसल्याचे कथन केले आहे.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ मधुकर माणिक शेलार जप्ती पंच यांनी त्यांच्या जबाबात असे सांगितले की, दि.०३.०९.२०२२ रोजी त्यांना पोलीसांनी मौजे दासखेड येथे जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते व त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा झाला

नव्हता. सदर साक्षीदाराने जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केले असले तरी पंचनाम्यामध्ये काय मजकूर नमूद केला आहे हे त्यांना माहीत नसल्याचे कथन केले. सदर जप्ती पंच यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने, अभियोगपक्षाने साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परंतु अभियोगपक्षास या साक्षीदाराच्या पुराव्यातून आरोपीविरुध्द काही मिळून आले नाही.

**१०.** आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर सादर केलेला नाही. अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.२ यांनी आरोपीच्या ताब्यातून देशी दारु जप्त करण्यात आल्याचे व जप्ती पंचनामा झाल्याचे नाकारले असल्याने, जप्त मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आला होता व तो देशी दारु होता हे शाबीत होत नाही. तसेच अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.१ यांनी त्यांचे उलटतपासादरम्यान कथन केले की, छापा टाकण्यापूर्वी त्यांनी बनावट ग्राहक पाठविले नव्हते, छापा टाकण्यासाठी गेले असता, त्यांनी पंचांना त्यांची अंगझडती दिली नव्हती तसेच त्यांना घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे या प्रकरणातील इतर साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे आरोपी बिगर परवाना, बेकायदेशीररित्या देशी दारु बॉबी संत्रा स्वतःजवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असताना मिळून आल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. **त्यामुळे मुद्दे क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविणेत येते.**

**मुद्दा क्रमांक २ बाबत –**

**११.** वर नमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरले, त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.**

**आदेश**

**१.** आरोपी **बाजीराव जनार्धन कोकाटे** यांची मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई)

प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे वैयक्तिक जातमुचलका (बंधपत्र) व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम १५,०००/– रुपयाचे वैयक्तिक बंधपत्र लिहून दयावे.

**४.** जप्त मुद्देमाल देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मि.ली. च्या ११ सिलबंद बाटल्या अपील कालावधी संपल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड यांच्याकडे कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवाव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

स्वाक्षरीत/–
(श्रीमती एस.एन.निकम)
दिनांक :– ०५/०५/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाटोदा

:: C E R T I F I C A T E ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
(S.S.Daskhedkar)
Steno Grade-III

(a) Dictated on : 05/05/2025
(b) Transcribed on : 05/05/2025
(c) Checked & signed on : 05/05/2025